देशोन्नती दि. 18.10.25

# स्थानिक गुन्हे शाखेच्या कारवाईत एक गावठी पिस्तुत व दोन जिवंत काडतुस जप्त

## आरोपी पोलिसांच्या ताब्यात

देशोन्नती वृत्तसंकलन

**नांदेड :** स्थानिक गून्हे शाखेच्या पथकाने १७ ऑक्टोबर रोजी बोंढार मार्गावर विनापरवाना गावठी पिस्तूल व जिवंत काडतूस बाळगणाऱ्यास ताब्यात घेतले असून दोघांविरुद्ध नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी स्थानिक गून्हे शाखेचे पोनि उदय खंडेराय यांना अवैधरित्या शस्त्र बाळगणाऱ्याना अटक करण्याचे आदेश दिले आहेत. त्या अनुषंगाने अप्पर पोलिस अधीक्षक सूरज गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली स्थागुशाचे पोनि उदय खंडेराय यांनी स्थापन केलेल्या पथकातील पोउपनि महेश कोरे व त्यांच्या टीमला १७ ऑक्टोबर रोजी एक इसम अवैध अग्निशस्त्र बाळगुन वाजेगाव बायपास ब्रिजजवळ बोंढारकडे जाणाऱ्या मार्गावर थांबल्याची माहिती मिळाली. या माहितीवरून नमुद ठिकाणी जावून आरोपी गंगाधर बोगरे (२३) रा. खपराळा ता. बिलोली ह.मु. वाजेगाव याची चौंकशी करून अंगझडती घेतली असता त्याच्या कंबरेला एक गावठी पिस्तूल व व मॅगझीनमध्ये दोन जिवंत काडतूस आढळून आले. आरोपीस अग्निशस्त्र व काडतुस कोणाकडून घेतले.

याबाबत विचारले असता त्याने सदरचे गावठी पिस्तूल हे सोनु नागरे रां. आळंदी जि. पुणे याच्याकडून घेतल्याचे सांगितले. सदर आरोपीस पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. या कारवाई पथकात पोउपनि महेश कोरे, पोहेकॉ प्रभाकर मलदोडे, मिलिंद नरबाग, श्रीराम दासरे, माधव माने, संघरत्न गायकवाड, महेश बडगु, राजू सिटीकर व दीपक ओढणे यांचा समावेश होता.